# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078

Address-sp office Bidco Road,Palghar west

E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.७५३ दिनांक २६.१०.२०२०

## पालघर पोलीसांकडुन जुगार खेळणा-या ०८ आरोपीतांवर कारवाई

दिनांक २५/१०/२०२० रोजी १५.४५ वा.सुमारास डहाणु पोलीस ठाणे हद्दीत पळे गावठानपाडा येथील एका वाडीत बांधलेल्या घराचे विहीरीच्या बाजुस मोकळ्या जागेत काही इसम जुगार खेळत असल्याची गुप्त बातमी मिळाली होती. मिळालेल्य माहितीच्या आधारे सदर ठिकाणी छापा टाकला असता यातील आरोपीत १) गोपाळ वसत मेहेर वय ४३ वर्षे रा.प्रभुपाडा सेटमेरीच्या मागे मसोली ता.डहाणु जि.पालघर २) राजेश पंढरी दुबळा वय ३८ वर्षे रा.सावटा दुबळापाडा ता.डहाणु जि.पालघर ३) शशिकांत पालीया माच्छी वय ३५ वर्षे रा.सावटा नवापाडा ता.डहाणु जि.पालघर ४) अशोक कमला यादव वय ३७ वर्षे रा.वाणगाव खडखडा ता.डहाणु जि.पालघर ५) यासिन इस्माईल नमाजी वय ५२ वर्षे रा.केटी नंगर बिल्डींग नं.८ ता.डहाणु जि.पालघर ६) जुबेर चांदआली खान, वय ५२ वर्षे, रा.बोईसर खैरापाडा गोल्डन हाऊस रुम नं.०४ व ०५ खैरापाडा ग्रामपंचायती जवळ ता.जि.पालघर ७) हनिफ गफ्फार मेमन वय ६० वर्षे रा.अब्बास बोरीची चाळ पटेलपाडा ता.डहाणु जि.पालघर ८) श्री. चंद्रकांत कल्याणजी शहा, वय ६२ वर्षे, रा. इराणीरोड एचडीएफसी बँकेच्या वरती ता.डहाणू जि.पालघर यांनी स्वत:च्या आर्थिक फायद्याकरीता मोकळ्या जागेत एकुण २,७६,३५४/- रुपये किंमतीची जुगार खेळण्याचे साधने स्वतःच्या कब्जात बाळगुन जुगार पैसे लावून खेळीत व खेळवीत असतांना मिळुन आले म्हणून डहाणु पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ।। १८६/ २०२० मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यांना दिनांक २६/१०/२०२० रोजी ०१.१९ वा. अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप अधिक्षक गृह पालघर श्री.शैलेश काळे यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय बोइसर विभाग येथील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी केली आहे.